प्र.१ अ) "सामाजिक समता निर्माण झाली तरच शूद्रातिशूद्रांची आर्थिक उन्नती शक्य आहे."
'वैचारिक गद्य' मधील निबंधांच्या आधारे चर्चा करा. (१५)

**किंवा**

ब) "शूद्रातिशूद्रांची गुलामगिरीतून सुटका होण्यासाठी त्यांना शिक्षण देणे हाच उपाय आहे"
'वैचारिक गद्य' मधील निबंधाच्या आधारे विवेचन करा.

प्र.२ क) "कार्यक्षम होण्याची संधी दिली तर स्त्रियाही स्वावलंबी होऊ शकतात."
'वैचारिक गद्य' च्या आधारे परामर्श घ्या. (१५)

**किंवा**

ड) " उद्योगधंद्यातील अधोगतीची आणि शेतकऱ्यांच्या निकृष्ट स्थितीची कारणमीमांसा निबंधकारांनी कशी केली आहे?" 'वैचारिक गद्य' च्या आधारे विशद करा.

प्र.३ प) "त्या-त्या पेशातील माणसे वाङ्मय लेखन करायला लागली की भाषेची वाढ होते."
'वैचारिक गद्य' मधील निबंधाच्या आधारे स्पष्ट करा. (१५)

**किंवा**

फ) "अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नका हाच भातीय संस्कृतीचा संदेश आहे" 'वैचारिक गद्य' च्या आधारे चिकित्सा करा.

**प्र.४ टिपा लिहा.** (१५)

त) 'अस्पृश्योन्नतीचा पाया' मधील विचारदर्शन

**किंवा**

थ) 'सामाजिक समता' मधील माणसाचे नैसर्गिक हक्क

द) 'शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती आणि ती घालविण्याचे उपाय' मधील दुर्व्यसने

**किंवा**

ध) 'सख्यत्वासाठी' मधील जीवन दृष्टी

ट) 'भाषाभिवृध्दीची सामाजिक दृष्टी' मधील मध्यवर्ती विचार

**किंवा**

ठ) 'मुंबई - १९९९' मधील मराठी भाषा विषयक चिंतन (१०)